| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोननं. ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**प्रेसनोट क्रमांक :- १७०-२२** **दिनांक - ०९/०६/२०२२**

**घरफोडीच्या गुन्हयातील पळुन जाणाऱ्या आरोपीस मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा**

माणिकपुर पोलीस ठाणे गुरन I ७८/२०२२ भादंविस कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ मधील पाहीजे आरोपीत नामे १) रफिक हनिफ शेख ऊर्फ चिक्या २) सुलतान शेख यांना गुन्हे शाखा-वसई युनिटचे पोलीस अधिकारी/अंमलदार हे दिनांक २३.०५.२०२२ रोजी २३.०० वा चे सुमारास भाईंदर युनिट कार्यालय येथुन ताब्यात घेवुन वसई युनिट कार्यालयाकडे सरकारी वाहन क्रमांक एम एच - ०४ - ईपी-०४०१ मधुन घेवुन जात असताना वालीव पोलीस ठाणे हद्दीतील सातीवली खिंडीतील चढणीवर अचानक नमुद आरोपींनी वाहनाचे मागील दरवाजा उघडुन चालत्या वाहनातुन बेडीसह उडया मारुन जंगलात पळुन गेल्याने वालीव पोलीस ठाण्यात गुरनं I ५४०/२०२२ भादंविस कलम २२४ प्रमाणे दिनांक २४.०५.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास वालीव पोलीस ठाण्याचे पोउनि सी आर पाटील यांचेकडे देण्यात आला होता.

वसई युनिटचे पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी पळुन गेलेल्या आरोपींचा सत्वर शोध घेवुन ते मिळुन आल्याने त्यांना माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I ७८/२०२२ भादंविस कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ मध्ये दिनांक २४.०५.२०२२ रोजी अटक केली होती.

त्यानंतर पोउनि सी आर पाटील यांनी माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I ७८/२०२२ या गुन्हयातुन आरोपीत १) रफिक हनिफ शेख ऊर्फ चिक्या २) सुलतान शेख यांचा दिनांक ०८.०६.२०२२ रोजी १४.१८ वा ताबा घेवुन त्यांना सदर गुन्हयात अटक करुन त्यांचे विरुध्द सबळ पुरावे गोळा करुन आरोपीत यांना आज दिनांक ०८/०६/२०२२ रोजी सबळ पुराव्यासह लागलीच दोषारोप पत्र मा. श्री एस डी हारघुडे, ५ वे न्यायालय वसई येथे हजर केले असता मा न्यायालयाने त्यांना ०३ महिने कारावास व १०००/रु दंड व दंड न भरल्यास १ महिना कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, पोउनि सी आर पाटील नेमणुक वालीव पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.